# अॅकॅडमी सायन्सच्या 'यंग असोसिएट'पदी डोंगळे

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे सहायक प्राध्यापक डॉ. तुकाराम द. डोंगळे यांची महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ सायन्सच्या 'यंग असोसिएट' पदावर निवड झाली.



डॉ. डोंगळे हे विद्यापीठात आठ वर्षांपासून कार्यरत आहेत. या कालावधित त्यांनी केलेल्या संशोधनाच्या आधारे आणि यावर्षीच्या गुणांकनात 'इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी' या क्षेत्रामध्ये त्यांची निवड झाली. महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ सायन्सतर्फे दरवर्षी राज्यातील तरुण आणि प्रगल्भ संशोधकांची या पदासाठी निवड करण्यात येते. सध्या डॉ. डोंगळे हे मेमरी डिव्हाईसेस, न्यूरॉमॉर्फिक कॉम्प्युटिंग आणि विविध नॅनोमटेरियल्स यावर संशोधन करीत आहेत. त्यांचे ७० हून अधिक शोधनिबंध विविध आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांतून प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन प्रकल्प पूर्ण केलेल्या सुमारे २५ विद्यार्थ्यांना ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, इस्राईल, इटली, आदी देशांत उत्कृष्ट विद्यावेतनासह पीएच.डी. करण्याची संधी मिळाली आहे. त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. के. वाय. राजपुरे, ए. व्ही. मोहोळकर, के. के. शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले.



## विक्रम नोंदविला

डॉ. डोंगळे यांनी एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) करत असताना सेट परीक्षेत राज्यात, तर नेट परीक्षेत देशात सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण होण्याचा विक्रम नोंदविला आहे. त्यानंतर त्यांनी विद्यापीठामधून पीएच.डी. पूर्ण केली. कोरिया विद्यापीठामधून पोस्ट-डॉक्टरेट संशोधन पूर्ण केले.

# लक्षावधी गाडगेबाबांची आज गरज

## जिल्हाधिकारी डॉ. दौलत देसाई : डॉ. कलशेट्टी यांना संत गाडगे महाराज समाजभूषण पुरस्कार



**कोल्हापूर : डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांना डॉ. दौलत देसाई यांच्या हस्ते संत गाडगे महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. डी. टी. शिर्के, एस. एन. पाटील, एम. बी. शेख, संजय पाटील, प्राचार्य रा. तु. भगत.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

संत गाडगेबाबा आणि डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासारखी लक्षावधी माणसे तयार झाल्यास स्वच्छता अभियान यशस्वी होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. दौलत देसाई यांनी केले. महापालिकेचे माजी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांना संत गाडगे महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. रविवारी सायंकाळी संत गाडगे महाराज अध्यासनाच्या वतीने राम गणेश गडकरी हॉलमध्ये हा समारंभ झाला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

जिल्हाधिकारी देसाई म्हणाले, डॉ. कलशेट्टी यांनी १९७९ पासून स्वच्छतेचे काम सुरु केले. कोल्हापुरात तर त्यांनी कुटुंबाला वेळ न देता स्वच्छतेच्या कामात योगदान दिले. यामुळे संत गाडगेबाबा यांच्या नावाने दिलेला पुरस्कार त्यांना शोभतो. समाजामध्ये आज स्वच्छता तसेच जलसाक्षरतेची गरज आहे. संत गाडगेबाबा आणि कलशेट्टी यांच्यासारखी लक्षावधी माणसे तयार झाल्यास स्वच्छता अभियान यशस्वी होईल.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, डॉ. कलशेट्टी आणि डॉ. दौलत देसाई म्हणजे राम-लक्ष्मणाची जोडी आहे. त्यांनी समाजकल्याणाचे काम केले आहे. स्वच्छतेच्या कामात कलशेट्टी यांचे मोठे योगदान आहे.

डॉ. कलशेट्टी म्हणाले, संत गाडगेबाबा हे आजच्या पिढीलाही माहीत असलेले व्यक्तिमत्त्व आहे. दिवगंत ग्रामविकासमंत्री आर. आर. पाटील यांनी महाराष्ट्रात संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबवले. या अभियानाचे परदेशात स्टॉकहोम येथे सादरीकरण करण्याची संधी आपल्याला मिळाली. या अभियानामुळेच शासनाला स्वच्छतेचे महत्त्व कळाले. समाजाने संत गाडगेबाबा यांचे विचार कृतीत आणण्याची गरज आहे. यावेळी माजी उप-महापौर भूपाल शेटे यांनी विचार मांडले.

दरम्यान मेजर रुपा शहा, महापालिकेचे अभियंता आर. के. पाटील, एम.डी. देसाई, शिवाजीराव जाधव यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. प्राचार्य रा. तु. भगत यांच्या लोकसेवक गाडगेबाबा आणि कर्मयोगी या ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य रा. तु. भगत यांनी केले. आभार संजीवनी तोफखाने यांनी मानले.

# कौशल्य शिक्षणासाठी 80 अभ्यासक्रम

## व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम : बारमाही प्रवेश प्रक्रिया

नंदिनी नरेवाडी - पाटोळे : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २० : शिक्षण फार झालेलं असो किंवा कमी असो; नोकरी लागो किंवा न लागो; पण तुम्ही इच्छाशक्तीच्या बळावर एखादे कौशल्य असे आत्मसात करू शकाल, की त्यावर तुमचा उदरनिर्वाह भागू शकेल. असे एक नव्हे, दोन नव्हे, तब्बल ८० अभ्यासक्रम आजीवन अध्ययन व विस्तार विभागात सुरू आहेत. बारमाही स्वरूपात सुरू असलेली प्रवेश प्रक्रिया व त्याच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप पाहण्यासाठी या विभागाला भेट द्यावीच, अशी स्थिती आहे.**



लॉकडाउन काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. व्यवसाय थंडावला. अशा स्थितीत घरखर्च कसा भागवायचा असे कोडे पडले. अशात कमी शिक्षण झालेल्या व्यक्तींना एक महिना ते सहा महिने या कालावधीत छंदपूरक अभ्यासक्रम शिकणे व त्याचे व्यवसायात रूपांतर करून पैसे कमविणे याची वाट विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील अभ्यासक्रमातून मिळते आहे.

बालवाडी शिक्षिका, बेसिक कोर्स इन योगा, मोडी लिपी, योग शिक्षक, सूत्रसंचालन व निवेदन, व्यक्तिमत्त्व विकास, सुगम संगीत, व्यक्तिगत सौंदर्य संवर्धन, रोपवाटिका तंत्र प्रमाणपत्र, रेडिओ जॉकी, इव्हेंट मॅनेजमेंट, मानवी हक्क, समाजकार्य विभाग, फॅशन डिझायनिंग, फोटो शॉप, सी ॲंड सी, वेब डिझायनिंग, जावा प्रोग्रॅमिंग व जेन्टस् ब्युटी पार्लर अशा काही अभ्यासक्रमांची नावे ऐकली असतील; पण त्यातून रोजगाराची दडलेली संधी आपल्यासाठी खुली होणार आहे. यातील काही अभ्यासक्रम असे आहेत, की घरबसल्या स्वतःच स्वतः प्रशिक्षणातून व्यवसाय सुरू करता येऊ शकतो. यापूर्वी ज्यांनी येथून अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत, त्यातील ७० टक्के व्यक्तींनी कौशल्याच्या बळावर व्यवसाय व जोडव्यवसाय सुरू केला आहे.

निरंतर शिक्षण अभ्यासक्रमातील बालवाडी शिक्षिका शिक्षण, इव्हेंट मॅनेजमेंट, रेडिओ जॉकी या अभ्यासक्रमांना सर्वाधिक मागणी आहे. हे जरी खरे असले तरी इतर पन्नासहून अधिक विषय असे आहेत की जेथे जेमतेम संख्येने विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. मात्र या विषयातील सूक्ष्म बारकावे व व्यावसायिक पदर समजून घेतल्यास कमकुवत वाटणारा विषयसुद्धा आपला मासिक खर्च भागवेल, एवढे उत्पन्न मिळवून देऊ शकतो, याचीही साक्ष मिळते.

### वयाचे नाही बंधन

या विभागात दिल्या जाणाऱ्या कौशल्याधारित शिक्षणामध्ये अभ्यासक्रमात १६ वर्षांपासून अगदी ९० वर्षांच्या ज्येष्ठ व्यक्तीही प्रवेश घेतात. अगदी तिशी - पन्नाशीतही हा अभ्यासक्रम पूर्ण करून स्वतःचा व्यवसाय उभा केल्याची कित्येक उदाहरणे या विभागात पाहायला मिळतात.

**शिक्षण अर्धवट सोडल्यानंतर काही अडचणींमुळे पुढे शिकता येत नाही. शिकण्याची इच्छा आहे, अशा व्यक्ती येथे शिक्षण घेऊन कौशल्य विकसित करत आहेत. येथे शिक्षण घेणाऱ्या कित्येकांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. अभ्यासक्रमाचे वर्गही त्यांच्या सोईनुसार असल्याने मोठा प्रतिसाद मिळतो.**
**- प्रा. डॉ. सुमन बुवा**

# अटल भूजल योजनेसाठी शिवाजी विद्यापीठाचे 'एनएसएस'चे विद्यार्थी जनजागृती करणार

## डॉ. कलशेट्टी यांच्या उपस्थितीत विद्यापीठात बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून अटल भूजल योजनेच्या जनजागृतीचे काम केले जाणार आहे. याच्या माध्यमातून पाणी व्यवस्थापनाबाबत काम करण्याचा निर्णय बैठकीत झाला.

शिवाजी विद्यापीठात अटल भूजल योजनेसंदर्भात पुण्याच्या भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी नियोजन बैठक झाली. यावेळी डॉ. कलशेट्टी म्हणाले, अटल भूजल योजनासाठी शिवाजी विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण योगदान असणार आहे. पाणी वापर, जलस्रोत, पाणी बचत जनजागृतीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक-स्वयंसेविका यांनी योगदान द्यावे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले,



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित नियोजन बैठकीत बोलताना पुण्याच्या भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

**(छाया : नाज ट्रेनर)**

पाणी वाचविणे व पाण्याचा योग्य वापर करणे यावर काम करणे काळाची गरज आहे. लवकरच कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक-स्वयंसेविका यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. यावेळी प्र कुलगुरू डॉ.पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ.व्ही. डी. नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा विभागाचे संचालक, प्रा. अभय जायभाये, भूगोल विभागाचे प्रमुख सुरेश शिंदे, उदय गायकवाड, प्रा. सदाशिव मोरे, प्रा. अखिलेश शिंदे, प्रा. एच. बी.पाटील, प्रा. अमोल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

जैविक नॅनोकणांच्या संशोधन : 'बिल्डर' योजनेत राज्यातील एकमेव विद्यापीठ

# शिवाजी विद्यापीठात पाच कोटींचा प्रकल्प

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जैविक नॅनोकणांच्या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाला केंद्र सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या बूस्ट टू युनिव्हर्सिटी इंटरडिसिप्लिनरी लाइफ सायन्स डिपार्टमेंट्स फॉर एज्युकेशन अँड रिसर्च प्रोग्राम (बिल्डर) योजनेअंतर्गत पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या योजनेअंतर्गत निधी प्राप्त करणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे.


पी. एस. पाटील


किरण पवार


के. डी. सोनवणे


एम. एस. निंबाळकर

केंद्रीय जैवतंत्रज्ञान विभागाने आंतरविद्याशाखीय संयुक्त संशोधन प्रकल्पांना चालना देण्याच्या हेतूने डीबीटी-बिल्डर ही योजना जाहीर केली. त्याचा हेतू जैवविज्ञानातील विविध शाखांनी एकत्रित येऊन संयुक्त प्रकल्प करावेत. त्यातून भरीव संशोधन आकाराला यावे, असा आहे. शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र, नॅनोसायन्स व तंत्रज्ञान आणि बायोइन्फॉर्मेटिक्स या तीन विद्याशाखांनी सूक्ष्म सजीवांपासून उपयुक्त नॅनो कणांच्या निर्मितीचा प्रकल्प सादर केला. प्रकल्प मंजूर होऊन त्यासाठी पाच कोटी रुपयांचा निधीही प्राप्त होणार आहे. यातील भरीव निधी हा उपयुक्त, आधुनिक सामग्री व उपकरणे घेण्यासाठी वापरता येणार आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू आणि या प्रकल्पाचे समन्वयक डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

## असे होणार संशोधन

१ या प्रकल्पांतर्गत नॅनोसायन्स विभागाचे डॉ. किरण पवार हे विविध धातूंचे वेगवेगळ्या आकाराचे नॅनोपार्टीकल्स तयार करणे. भौतिक गुणधर्म तपासणे याविषयी संशोधन करणार आहेत. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे डॉ. के. डी. सोनवणे हे बायोइन्फॉर्मेटिक्स तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नॅनोकण व नॅनो मटेरिअल यांचे सिंथेसिस आणि नॅनोपार्टीकल्सचा सजीव पेशींमध्ये परिणामांविषयी चाचण्या करतील.

२ वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. एम. एस. निंबाळकर हे संशोधन व विकासाच्या जबाबदारीसह विविध जीवाणू, विषाणू, वनस्पती आणि कवक यांच्यामधील नॅनोतंत्रज्ञानाला उपयुक्ततेबाबत संशोधन करतील. पश्चिम घाटातील विविध वनस्पतींचा नॅनोपार्टीकल तयार करण्यासाठी आणि त्यांच्या औषधी व शेतीपूरक वापराबाबत संशोधन करतील.

या संशोधन प्रकल्पामुळे विद्यापीठातील जैवविज्ञानातील आंतरविद्याशाखीय संशोधनाला मोठे बळ लाभले आहे. अनेकविध प्रकारचे जैविक नॅनोकण, नॅनो मटेरिअल सामोरे येतील. ज्यांचा भविष्यातील संशोधन, विकास व उपयोजन यावर मोठा दूरगामी स्वरुपाचा प्रभाव असेल. - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

## नॅनोकण निर्मितीची माहिती

नॅनोकण बनविणाऱ्या जीवाणूंचा शोध, नॅनोकण व नॅनो-मटेरिअलचा कर्करोग, कृषी-क्षेत्रासाठी उपयुक्त नॅनोमटेरिअल, नॅनो पेस्टीसाईड, आदी अनुषंगानेही संशोधन केंद्रित असेल.

# शिवाजी विद्यापीठ करणार भूजल योजना जनजागृती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात अटल भूजल योजनेसंदर्भात पुण्याच्या भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी नियोजन बैठक झाली. या बैठकीत शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत अटल भूजल योजना जनजागृती करण्याचा निर्णय झाला.

बैठकीतील चर्चेदरम्यान डॉ. कलशेट्टी म्हणाले, अटल भूजल योजनेसाठी शिवाजी विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण योगदान असणार आहे. पाणी वापर, जलस्रोत, पाणी बचत जनजागृतीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक-स्वयंसेविका यांनी योगदान द्यावे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठ हे पाणी व्यवस्थापनात नेहमीच आग्रही आहे. लवकरच कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक-स्वयंसेविका यांना प्रशिक्षण दिले जाईल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजनाचे संचालक, प्रा. अभय जायभाये, भूगोल विभागाचे प्रमुख सुरेश शिंदे, उदय गायकवाड, प्रा. सदाशिव मोरे, प्रा. अखिलेश शिंदे, प्रा. एच. बी. पाटील, प्रा. अमोल कुलकर्णी उपस्थित होते.

# महाराष्ट्र ॲकॅडमी सायन्सचे डॉ. डोंगळे 'यंग असोसिएट'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. तुकाराम डोंगळे यांची 'महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्स'च्या 'यंग असोसिएट' या प्रतिष्ठेच्या पदावर निवड झाली. डॉ. डोंगळे शिवाजी विद्यापीठात आठ वर्षांपासून कार्यरत असून या कालावधीत त्यांनी केलेल्या संशोधनाच्या आधारे त्यांची निवड करण्यात आली. या वर्षीच्या गुणांकनात 'इंजिनीरिंग आणि टेक्नॉलॉजी' या क्षेत्रामध्ये डॉ. डोंगळे यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सतर्फे दरवर्षी राज्यातील तरुण, प्रगल्भ संशोधकांची या पदासाठी निवड करण्यात येते.



डॉ. टी. डी. डोंगळे

डॉ. डोंगळे यांनी एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) करीत असतानाच सेट आणि नेट या परीक्षांत महाराष्ट्रात तसेच देशात, सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण होण्याचा विक्रम नोंदविला आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठामधून पीएच.डी. पूर्ण करून दक्षिण कोरिया येथील कोरिया विद्यापीठामधून पोस्ट-डॉक्टरेट संशोधनही पूर्ण केले. सध्या ते मेमरी डिव्हाईसेस, न्यूरॉमॉर्फिक कॉम्प्युटिंग आणि विविध नॅनोमटेरियल्स यांवर संशोधन करत आहेत. आजवर त्यांचे ७० हून अधिक शोधनिबंध विविध शोधपत्रिकांतून प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन प्रकल्प पूर्ण केलेल्या २५ हून अधिक विद्यार्थ्यांना ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, इस्राईल, इटली आदी देशांत उत्कृष्ट विद्यावेतनसह पीएच.डी. करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

डॉ. डोंगळे यांना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. आर. के. कामत, प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे, प्रा. डॉ. ए. व्ही. मोहोळकर, स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे संचालक डॉ. के. के. शर्मा यांचे मार्गदर्शन मिळाले.